# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### राज्यातील ग्रामीण भागातील जनतेला आवश्यक असणारे सर्व दाखले ग्रामपंचायत स्तरावरुन मिळणेबाबत

**(१) ६६३७ (११-०४-२०२०). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील जनतेला आवश्यक असणारे सर्व दाखले ग्रामपंचायत स्तरावरुन मिळत नसल्याने जनतेची कामे प्रलबित रहात असल्याचे माहे जानेवारी,२०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन जनतेला आवश्यक असणारे सर्व दाखले ग्रामपंचायत स्तरावरुन त्वरीत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (०२-०१-२०२४) :** (१) नाही, हे खरे नाही.

ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय दि. १४/०७/२०१५ नुसार विभागाकडील एकूण १३ अधिसूचित लोकसेवांपैकी सात प्रकारचे दाखले शासन निर्णय दि. १३/०२/२०१९ अन्वये आपले सरकार सेवा केंद्रामधून देण्यात येत असून ग्रामपंचायतीकडून द्यावयाच्या उर्वरीत सर्व दाखल्यांऐवजी ग्रामस्थांकडून विहीत नमुन्यातील स्वयंघोषणापत्र स्वीकारण्यात येतात.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुळावा ( जि. यवतमाळ ) येथील बसस्थानक परिसरातील भूखंडावरील अतिक्रमण हटविण्याबाबत

**(२) ४३१३४ (०७-०४-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळावा (जि.यवतमाळ) येथील बसस्थानक परिसरातील भूखंडावरील अतिक्रमित जागेवरुन गावातील दोन गटांत वारंवार भांडण तंटे होत असून ग्रामपंचायतीचा हा लाखो रुपयांचा भूखंड अतिक्रमणाच्या विळख्यात अडकत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर भूखंडावरील अतिक्रमण हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-०१-२०२४) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) सदर प्रकरणी, यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड तालुक्यात मुळावा येथील बसस्थानक परिसरातील, अतिक्रमण झालेला भूखंड सार्वजनिक बांधकाम विभाग व ग्रामपंचायत यांच्या अखत्यारीतील असल्याने संयुक्त्यरीत्या अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भभवत नाही.

---

वि.स. २३२ (2)

**महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाच्या हद्दीतील दांडी (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील समुद्र किनारी स्टॉलधारकांकडून दरमहा भाडे आकारले जात असल्याबाबत**

**(३) ५०३३६ (०९-०३-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाच्या हद्दीतील दांडी (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) समुद्र किनारी पुळणी येथील जागेवर तात्पुरत्या स्वरुपात व्यावसायिक उद्देशाने वापर करणाऱ्या स्टॉलधारकांकडून बंदर विभागाकडून यांच्याकडून दरमहा भाडे वसूल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी बंदर विभागाकडून स्टॉलधारकांना हमीपत्राचा नमुना देऊन कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्टॉलधारकांकडून दरमहा किती भाडे आकारण्यात येणार आहे?

**श्री. संजय बनसोडे (२१-०२-२०२४) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कवठा ते हिवरदरी (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथील उपविभागीय अभियंता यांच्या विरोधात करणेबाबत**

**(४) ५१५४८ (१८-०१-२०२३). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कवठा ते हिवरदरी (ता.महागांव, जि.यवतमाळ) जोडरस्त्यांचे काम कागदोपत्री पूर्ण करुन त्यांची मोजमाप पुस्तिका (एमबी) बनविल्याप्रकरणी उपविभागीय अभियंता यांच्या विरोधात कारवाईचा प्रस्ताव राज्य शासनाकडे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान पाठविण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रस्तावासंदर्भात अद्यापपर्यंत शासनाने कोणताच निर्णय घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत वर्षभरातील सर्वच कामांची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली तसेच केलेल्या कारवाईचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२१-०२-२०२४) :** (१) व (२) संबंधित उप विभागीय अभियंता हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी असून ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग पुसद येथे ते कार्यरत होते. जिल्हा परिषदेने त्यांना महागाव येथील बांधकाम उपविभागाचा अतिरिक्त कार्यभार दिला होता. सदर प्रकरणामध्ये झालेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेने मे, २०२२ मध्ये त्यांच्याविरोधात कारवाईचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठविला होता. तथापि, प्राधिकरणाने दिनांक १०.६.२०२२ च्या पत्रान्वये सदर प्रस्ताव अमान्य केला होता. तद्नंतर जिल्हा परिषदेने नोव्हेंबर, २०२२ मध्ये संबंधित उप विभागीय अभियंता यांच्याविरोधात कारवाईचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता. तथापि संबंधित उप विभागीय अभियंता हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी असून त्यांच्या सेवाविषयक बाबी प्राधिकरणामार्फत हाताळल्या जात असल्यामुळे सदर प्रकरण डिसेंबर, २०२२ मध्ये शासनाकडून प्राधिकरणाकडे पाठविण्यात आले आहे. प्राधिकरणाच्या दिनांक १७.१०.२०२३ च्या आदेशान्वये संबंधित उप अभियंता यांची महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, धाराशिव येथे बदली करण्यात आलेली आहे. तसेच त्यांच्याविरुद्ध प्राधिकरणाच्या दिनांक २७.१२.२०२३ रोजीच्या ज्ञापनान्वये महाराष्ट्र नागरी सेवा(शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ अंतर्गत दोषारोप बजाविण्यात आले असून विभागीय चौकशीची कार्यवाही चालू आहे.

वि.स. २३२ (3)

(३) कवठा-हिवळदरी जोड रस्ता व राऊत वाडी ते बारभाई रस्त्याची दुरुस्ती या सन २०२२ मधील कामांची चौकशी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली आहे. यामध्ये दोषी कनिष्ठ अभियंता यांना जिल्हा परिषदेने दिनांक ०६.०५.२०२२ च्या आदेशान्वये निलंबित केले होते. तसेच त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरु केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हा परिषदेकडून शिक्षकांना वैद्यकीय बिलाकरीता दिलेल्या झालेला गैरप्रकार**

**(५) ५१५६६ (२१-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषदेकडून शिक्षकांना वैद्यकीय देयकासंदर्भत दिलेल्या निधीत गैरप्रकार झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२१-०२-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात वैद्यकीय विक्री प्रतिनिधी (मेडिकल रिप्रेझेनटेटीव्ह) म्हणून महिलांना प्रधान्य देण्याकरिता धोरण आखण्यासंदर्भात**

**(६) ५६५८१ (२८-०४-२०२३). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिलांनी विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली असली तरी पुरोगामी महाराष्ट्रात फारच कमी महिला वैद्यकीय विक्री प्रतिनिधी (मेडिकल रिप्रेझेनटेटीव्ह) म्हणून कार्यरत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या क्षेत्रात महिला काम न करण्याचे प्रमुख कारणे ही त्यांना येत असलेल्या विविध अडचणी व असुरक्षितता आहेत ,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या महिलांसाठीच्या तक्रार निवारण समितीत औषधी क्षेत्रातील महिलांना स्थान मिळवे अशी मागणी राज्य वैद्यकीय विक्री संघटनानी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वैद्यकीय क्षेत्रातील महत्वाच्या मानल्या जाणा-या वैद्यकीय विक्री प्रतिनिधी (मेडिकल रिप्रेझेनटेटीव्ह) म्हणून महिलांना प्रधान्य देण्यासाठी यासंदर्भात निश्चित असे धोरण तयार करण्यासाठी शासन कोणती भूमिका घेणार आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (२७-०२-२०२४) :**(१), (२), (३), (४) व (५)

वैद्यकीय विक्री प्रतिनिधी (मेडिकल रिप्रेझेनटेटीव्ह) हे औषधी व वैद्यकीय उपकरणांचे उत्पादन करणाऱ्या खासगी कंपन्यांकडे नोकरी करणारे प्रतिनिधी असतात. खाजगी कंपन्यामध्ये वैद्यकीय विक्री प्रतिनिधीची (मेडिकल रिप्रेझेनटेटीव्ह) नियुक्ती करण्याच्या प्रक्रीयेवर शासनाचे नियंत्रण नसते. सदर प्रकरणी महिला प्रतिनिधी नेमणेबाबत निर्णय घेणे, याबाबत धोरण ठरविणे ह्या बाबी संपुर्णपणे संबंधित खाजगी कंपनीच्या अधिकार क्षेत्रातील बाबी आहेत.

सदर खाजगी कंपन्यांमार्फत उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या रोजगारामध्ये महिलांना प्राधान्य देण्याबाबत शासनामार्फत धोरण निश्चित करण्याची बाब विचाराधीन नाही. तथापि, सदर महिला व मुलींना या खाजगी क्षेत्रामध्ये काम करीत असतांना अडचणी व त्रास जाणवल्यास महिला तक्रार निवारण कायद्यांतर्गत, इतर अनुषंगिक कायदे तसेच इतर यंत्रणामार्फत कार्यवाही करण्यात येते.

---

## औदयोगिक प्रशिक्षण केंद्रे मधील (आयटीआय) विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता व प्रवेश शुल्काची रक्कम न मिळाल्याबाबत

**(७) ५८६७७ (०४-०५-२०२३). श्री.दिपक चव्हाण (फलटण), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात १८ शासकीय महाराष्ट्रातील औदयोगिक प्रशिक्षण केंद्रे (आयटीआय) असून, बहुतांश ठिकाणी नियमित प्राचार्य नसल्यामुळे कार्यरत प्राचार्यांवर इतर कामांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने आयटीआय विद्यार्थ्यांसाठी हिवाळी अधिवेशनात विद्यावेतनात वाढ केलेली असली तरी आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना सन २०१८ ते २०२२ पर्यंत या चार वर्षांपासून निर्वाहभत्ता आणि प्रवेश शुल्क मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयटीआयच्या सर्व व्यवसायांमध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या प्रशिक्षणार्थ्यांना आदिवासी विकास विभागाने मंजूर केल्यानुसार प्रतिमाह निर्वाहभत्ता देण्याची तरतूद असून त्याकरीता आदिवासी विकास विभागाकडून अनुदानही दिले जाते, याबाबतचे अनुदान शासनाकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतरही प्रशिक्षणार्थ्यांना निर्वाह भत्त्याचे वाटप झाले नसल्याचेही प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनी दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (१४-०२-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. चंद्रपूर जिल्हयात १८ औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु असून ६ संस्थांना नियमित प्राचार्य कार्यरत आहेत व उर्वरित १२ संस्थांना अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

(२) नाही, हे खरे नाही. चंद्रपूर जिल्हयातील १८ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना एकात्मिक आदिवासी विकास विभागाकडून मंजूर झालेल्या यादीनुसार निर्वाह भत्याची रक्कम वाटप करण्यात आली आहे.

(३) होय, आयटीआयच्या सर्व व्यवसायांमध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या प्रशिक्षणार्थ्यांना आदिवासी विकास विभागाने मंजूर केल्यानुसार प्रतिमाह निर्वाहभत्ता देण्याची तरतूद असून त्याकरीता आदिवासी विकास विभागाकडून अनुदानही दिले जाते, हे खरे आहे. तथापि, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चंद्रपूर (मुलींची) या संस्थेतील ०८ मुलींनी सन २०१७ ते २०१९ या वर्षामध्ये निर्वाहभत्ता व अनामत रक्कम मिळाले नसल्याची तक्रार केली आहे, हे ही खरे आहे.

(४) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चंद्रपूर (मुलींची) या संस्थेतील ०८ विद्यार्थीनी पैकी ५ मुलींचे अनामत रक्कम व ३ मुली अनुसूचित जमाती प्रवर्गातील असून त्यांचे निर्वाहभत्ता रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मारोडा (ता.मूल, जि.चंद्रपूर) या गावात जनसुविधे योजनेअंतर्गत झालेली गैरव्यवहार**

**(८) ६१३८१ (०३-०५-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मारोडा (ता.मूल,जि.चंद्रपूर) या गावात जनसुविधेतंर्गत विविध विकास कामे करण्यासाठी शासनाकडून दोन कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी एम.बी.रेकॉर्ड व कॅशबुकमध्ये खर्च दाखविण्यात आला असून शासनाने चौकशी केली असता प्रत्यक्षात कामे केली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-११-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.

ग्रामपंचायत मारोडा, पं.स. मुल जि. चंद्रपुर या गावाला जनसुविधा योजने अंतर्गत शासनाकडुन २.०० कोटी रुपये प्राप्त झालेले नसून जिल्हा स्तरावरील नागरी सुविधा योजनेअंतर्गत सन २०१५-१६ ते २०१९-२० या कालावधीत रु.१,८६,८०,०००/- इतका निधी प्राप्त झालेला आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

सन २०१५-१६ या वर्षात प्राप्त झालेल्या निधीतून ग्रामपंचायतीने केलेल्या कामांपैकी १. श्री. गणपत मेश्राम ते सदगुरु शंडे यांच्या घरापर्यंत सी.सी. नाली बांधकाम २. व्यायाम शाळा ते उध्दव कन्नमवार यांचे घरापर्यंत सी.सी. नाली बांधकाम ही दोन बांधकामे न करता कॅशबुकात खर्च नोंदविण्यात आलेला आहे.

त्यानुसार, गट विकास अधिकारी, मुल यांनी तत्कालीन ग्राम सचिव यांच्यावर नियमानुसार कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्ह्यात देशातील पहिल्या ड्रायपोर्ट चे काम मागील नऊ वर्षापासून सुरू असूनही अद्याप पर्यंत अपूर्ण असल्याबाबत**

**(९) ६२९३४ (२६-०४-२०२३). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात देशातील पहिल्या ड्रायपोर्ट चे काम मागील नऊ वर्षापासून सुरू असूनही अद्याप पर्यंत अपूर्ण असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे आहे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ड्रायपोर्टचे काम संथ गतीने सुरू असल्याने या परिसरातील शेतकरी, बेरोजगार व्यावसायिक आणि सामान्य जनता सदर काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय बनसोडे (२१-०२-२०२४) :**(१) नाही.

ड्रायपोर्टचे काम प्रगतीत आहे. या प्रकल्पासाठी बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालय तसेच इतर वैधानिक प्राधिकरणांकडून मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर प्रकल्पासाठी भूसंपादनाचे काम पूर्ण झालेले असून रेल्वे व रस्ते जोडणी, पाणी, वीज इत्यादी पायाभूत सुविधांचे बहुतांशी काम पूर्ण झाले आहे. प्रकल्पाचा पहिला टप्पा अंदाजे मार्च, २०२४ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(२) असे निवेदन प्राप्त झालेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुर्णा (जि. परभणी) शहरालगत एमआयडीसी सुरू करणेबाबत

**(१०) ६३१९६ (२६-०४-२०२३). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुर्णा (जि. परभणी) शहरालगत एमआयडीसी सुरू करण्यासाठी आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी प्रक्रिया उद्योग व इतर औद्योगिक वसाहत नसल्यामुळे तालुक्यातील कुशल व अकुशल कामगारांना इतरत्र कामासाठी जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुर्णा शहरालगत एमआयडीसी सुरू करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी (गंगाखेड) मा. उद्योग मंत्री यांना दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०९-११-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत परभणी,जिंतुर व गंगाखेड या ३ ठिकाणी औद्योगिक क्षेत्रे विकसीत करण्यात आलेली आहेत. पुर्णा शहरापासून गंगाखेड औद्योगिक क्षेत्र ५६ कि.मी.,परभणी औद्योगिक क्षेत्र ४४ कि.मी. तसेच जिंतुर औद्योगिक क्षेत्र ७९ कि.मी. अंतरावर कार्यान्वित आहेत.

(३) अशा प्रकारचे कोणतेही निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील सर्व ग्रामसेवक व तलाठी यांना मुख्यालयी राहण्यास सक्ती करण्याबाबत.

**(११) ६३२१५ (०२-०५-२०२३). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील सर्व ग्रामसेवक व तलाठी यांना शासन निर्णयानुसार आपल्या सज्जाच्या ठिकाणी (मुख्यालयी) राहणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामसेवक व तलाठी यांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या मानधनामध्ये घरभाड्याचा समावेश केलेला असतानाही ग्रामसेवक व तलाठी आपल्या मुख्यालयी राहत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उकत जिल्हयातील ग्रामसेवक व तलाठी यांना त्यांच्या मुख्यालयी राहण्यास सक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे. परभणी जिल्ह्यातील ग्रामसेवक मुख्यालयी राहात असल्याबाबत पंचायत समितींनी संबंधित सरपंचांचे प्रमाणपत्र व ग्रामसभा ठराव घेतले आहेत. तथापि, काही ग्रामसेवकांना अतिरिक्त ग्रामपंचायतींचा कार्यभार देण्यात आलेला आहे. तसेच तसेच तलाठी संवर्गाबाबत तलाठी सज्जाच्या ठिकाणी राहात असल्याबाबतचा अहवाल संबंधित तहसीलदार यांनी जिल्हाधिकारी, परभणी यांना दिला आहे.

(३) ग्रामविकास विभागाचे दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ चे परिपत्रकान्वये ग्रामसेवक/ ग्राम विकास अधिकारी यांनी मुख्यलयी राहात असल्यासंबंधी ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेचा ठराव बंधनकारक करण्यात आला आहे. तसेच महसूल व वन विभागाने तलाठ्यांनी सज्जा मुख्यालयी उपस्थित राहण्याबाबत दिनांक १८.८.२०२३ रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्याबाबत**

**(१२) ६४७२९ (२५-०८-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २७९२० ग्राम पंचायतीमध्ये काम करीत असलेल्या सुमारे ६००० ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसाठी नेमण्यात आलेल्या अभय यावलकर समितीच्या शिफारशी अंमलात आणणे व नगरपरिषद कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन श्रेणी व निवृत्ती वेतन श्रेणी व सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यासह अन्य लाभ देणे इ. मागण्या शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायत कर्मचारी हा जिल्हा परिषद व नगर पालिकेच्या कर्मचाऱ्या प्रमाणे पाणी शुध्दीकरण, विज पुरवठा, गटारे, सफाई, पथपिदेवे ग्राम पंचायत कर वसुलीचे काम तसेच केंद्र शासन व राज्य शासनाच्या विविध योजना तसेच कोरोना (कोविड-१९) ची कामे व त्या संबंधीची माहिती गाव पातळीवर घरोघरी तसेच वरिष्ठा पर्यंत पोहचविण्याचे काम अल्प वेतनात नियमित करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांनी जळगाव येथील मा.ग्रामविकास मंत्री यांच्या कार्यालयावर दिनांक २१ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढून निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांना अभय यावलकर समितीच्या शिफारशी अंमलात आणणे व नगरपरिषद कर्मचा-यांप्रमाणे वेतनश्रेणीसहित अन्य लाभ देण्यासंदर्भात प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-११-२०२३) :**(१) अंशत: हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ३ जुलै, १९९० च्या अधिसूचनेनुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतन दर ठरविण्यात आले असून ग्राम विकास विभागाच्या दि.२२.६.२०२२ च्या शासन निर्णयान्वये ग्रामपंचायत कर्मचारी यांचे वेतन सुधारित केले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) संघटनांनी केलेल्या प्रमुख मागण्यांबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जऊळके खुर्द (बोऱ्हाडे) (ता.खेड, जि.पुणे) राजगुरुनगर येथील रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(१३) ६४९९६ (२३-०८-२०२३). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जऊळके खुर्द (बोऱ्हाडे), (ता.खेड, जि.पुणे) राजगुरुनगर येथील मच्छीद्र बोऱ्हाडे ते बोरकुटे रस्ता, जुनावना रस्ता, बेदाडवस्ती रस्ता, गणपती मंदिर ते किसन बोऱ्हाडे यांच्या घरापर्यंतचा रस्ता, चिघरवस्ती रस्ता, दरा ते ठाकरवाडी या प्रमुख रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

वि.स. २३२ (8)

(२) असल्यास, सदरहू स्थानिकांनी वारंवार रस्ते दुरुस्ती संबंधी स्थनिकांनी वारंवार करूनही शासनाने अद्यापी कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदअनुषंगाने सदर नादुरुस्त रस्ते तातडीने दुरुस्त करुन नागरिकांना ये-जा करण्यास उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-११-२०२३) :**(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

सदर रस्ते दुरुस्तीकरिता सरपंच/ ग्रामसेवक, ग्रामपंचायत जऊळके यांनी मागणी केली आहे. सदर रस्त्यांची लांबी ५.०३ कि.मी. असून त्यांच्या दुरुस्तीसाठी अंदाजे रु.२४५.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सदर कामांच्या मंजुरीसाठी प्रस्ताव जिल्हा परिषदेमार्फत जिल्हा नियोजन समितीकडे सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवन्हावे (ता.खालापूर, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील विकास कामांमध्ये झालेल्या गैरव्यवहार**

**(१४) ६५२६५ (२५-०८-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवन्हावे (ता.खालापूर, जि.रायगड) ग्रामपंचायतीमार्फत सन २०१७ ते आजतागायत करण्यात आलेल्या विकास कामांमध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्यामुळे सर्वच विकास कामांची सखोल चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांना माहे एप्रिल २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ग्रामपंचायत हद्दीत ठेकेदाराने अनेक विकास कामे अपूर्ण अवस्थेत ठेवली असून अनेक विकास कामांना सुरूवात झाली नसतानाही ठेकेदाराला पूर्णपणे कामांचे पैसे दिले गेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर देवन्हावे ग्रामपंचायत हद्दीतील विकास कामांमध्ये भ्रष्टाचार करणाऱ्या संबंधीत ठेकेदारावर तातडीने कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-११-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) नाही,

देवन्हावे ग्रामपंचायतीमार्फत १४ वा वित्त आयोग, ग्राम निधी, नागरी सुविधा,जनसुविधा, पं.स.सेस व जि.प.सेस अंतर्गत सन २०१७ ते २०२२-२३ या कालावधीत एकूण १५३ विकास कामे मंजूर केली असून, त्यापैकी १५३ सर्व विकास कामे पूर्ण झाली आहेत.

(३) प्रश्नच उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबेजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालयातातील रिक्त पदे तसेच प्रतिनियुक्तीने रिक्त झालेली पदे भरणेबाबत**

**(१५) ६६०१२ (२५-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)अंबेजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालयात कर्मचा-यांची

कमतरता असून देखिल उस्मानाबाद व परभणी येथे होऊ घातलेल्या वैद्यकीय महाविद्यालयासाठी तसेच परभणी येथे केंद्रीय पथक तपासणीला येणार असल्याच्या कारणाने सहाय्यक व सहयोगी अशा एकूण ११ प्राध्यापकांची अचानक प्रतिनियुक्तीने बदली करण्यात आली तथापि बदलीने रिक्त झालेल्या जागांचे कोणतेही नियोजन करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील ८ विभागांची ३ महिन्यापूर्वी नॅशनल मेडीकल कमिशन (NMC) परीक्षा झाली असून त्याचा निकाल येणे अपेक्षित असून नॅशनल मेडीकल कमिशन (NMC) च्या नियमानुसार १ ऑगस्ट ते ३१ जुलै या शैक्षणिक सत्रात एका महाविद्यालयात Apper झालेला कर्मचारी दुसऱ्या महाविद्यालयात दाखवता येत नाही असे असताना सदर महाविद्यालयातील कर्मचा-याच्या प्रतिनियुक्त्या करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्मचा-यांच्या प्रतिनियुक्त्या केल्याने महाविद्यालयातील पदवीत्तर (MD/MS) अभ्यासक्रम बंद होऊ शकतात तसेच रुग्ण सेवेवर गंभीर परिणाम होत असल्यामुळे प्रतिनियुक्त्या न करणेबाबत व केलेल्या सर्व प्रतिनियुक्त्या तातडीने रद्द करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांचेकडे दिनांक १० मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती. हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, सदर वैद्यकीय महाविद्यालयातील वर्ग-१ ची २१ पदे रिक्त भरण्यासाठी लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर रिक्त पदे भरणे तसेच प्रतिनियुक्तीने रिकामी झालेली पदे तात्काळ भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय?

**श्री. हसन मुश्रीफ (२२-०२-२०२४) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) भारतीय आयुर्विज्ञान आयोगाच्या निरिक्षणाच्यावेळी त्रृटी उद्भवू नये या दृष्टीकोनातून इतर संस्थेतील अध्यापकांना प्रतिनियुक्ती देण्यात येते. तथापि, संबंधित अधिष्ठातांकडून अध्यापकांस दुसऱ्या महाविद्यालयात कायमस्वरुपी दर्शविलेले नाही, याची दक्षता घेतली जाते.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे अंशत: खरे आहे.

(५) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सरळसेवा कोट्यातील अध्यापकांची रिक्त पदे भरण्यासंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्यात आली आहेत. तसेच पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## युवकांसाठी वेगळे मंत्रालय स्थापन करणेबाबत

**(१६) ६६१३३ (२५-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात युवकांसाठी वेगळे मंत्रालय नसून क्रीडा विभागाशी संलग्न युवक कल्याण विभागाचा कारभार चालविला जातो तसेच क्रीडा विभागाचे अधिकारीच युवक कल्याण विभागाचे काम पाहतात हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विभागामध्ये योजना अत्यंत मर्यादित असून पुरेशा प्रमाणात निधी सुद्धा उपलब्ध करून दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर युवकांसाठी वेगळे मंत्रालय स्थापन करण्याची मागणी वेळोवेळी वेगवेगळया संघटना व लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगान उक्त युवकांसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करून व्यापक प्रमाणात योजना राबविण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. २३२ (10)

**श्री. संजय बनसोडे (३१-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही. हे खरे नाही.

(३) नाही, हे खरे नाही. अशी मागणी केल्याचे अभिलेख्यावरुन आढळून येत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात बाह्यरुग्ण तपासणी (ओपीडी) पुन्हा सुरु करणेबाबत**

**(१७) ६६१६६ (२३-०८-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयात दररोज वातावरणात होत असलेले बदल त्यात अवकाळी पाऊस यामुळे व्हायरलचा संसर्ग वाढला असून शहरासह ग्रामीण भागात रुग्णसंख्येत वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जळगाव जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात बाह्यरुग्ण तपासणी (ओपीडी) गत दोन ते अडीच महिन्यांपासून बंद असल्याने रुग्णांचे हाल होत आहेत, हे ही खरे आहे, काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर ओपीडीचे कक्ष पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०३-११-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पंदेरी (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) येथील आदिवासी वस्त्या मधील घरकुले निसर्ग चक्रीवादळामुळे उध्वस्त झाल्याबाबत**

**(१८) ६६५९२ (२५-०८-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पंदेरी (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) येथील आदिवासी वस्त्यामध्ये इंदिरा आवास घरकुल योजनेमधून बांधलेली घरकुले निसर्ग चक्रीवादळामुळे उध्वस्त झाल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय;

(२) असल्यास, शासन नवीन २५ घरकुले बांधून देण्याबाबत विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला असून त्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-११-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) निसर्ग चक्रीवादळामुळे मौजे पंदेरी, ता.मंडणगड, जि.रत्नागिरी येथील आदिवासी वस्त्यांमधील इंदिरा आवास इ योजनेमध्ये बांधलेल्या २२ घरांचे नुकसान झाले होते. सदर लाभार्थ्यांपैकी २ लाभार्थ्यांना घरकुल नुकसानीची पूर्ण रक्कम तहसिल कार्यालयाकडून देण्यात आली आहे. तसेच, २ लाभार्थ्यांना शबरी आवास योजना व प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. ऊर्वरित १८ लाभार्थ्यांना तहसिल

कार्यालयाकडून अंशत: नुकसानीचा लाभ देण्यात आला आहे. सदर १८ लाभार्थ्यांपैकी १५ लाभार्थ्यांचा घरकुल पात्र प्रतीक्षा यादीमध्ये (ड यादी) समावेश आहे.ऊर्वरित ३ लाभार्थ्यांचा कोणत्याही योजनेमध्ये समावेश नसला तरी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती,मंडणगड यांच्यामार्फत सदर लाभार्थ्यांना शबरी आवास योजनेमधून लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दापोली मतदार संघातील बचत गटांना उद्योगाचे प्रशिक्षण देण्याकरिता जागा उपलब्ध करणेबाबत

**(१९) ६६६०२ (२५-०८-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दापोली मतदार संघातील तीन तालुके मिळून एकूण ४७९८ बचत गट असून या बचत गटांना उद्योगाचे प्रशिक्षण देण्याकरिता जिल्हा परिषदेच्या इमारती अथवा जागा नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-११-२०२३) :**(१) व (२) ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (RSETI) मार्फत ग्रामीण भागातील १८ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींना स्वयंरोजगार आधारित उद्योगाभिमुख प्रशिक्षण दिले जाते. तसेच सदर संस्थेमार्फतच स्वयंसहाय्यता समूहातील महिलांना देखील स्वयंरोजगार आधारित प्रशिक्षण दिले जात असून शांतीनगर कुवारबाव, रत्नागिरी येथे ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (RSETI) कार्यरत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बोईसर-नवापूर नाका ( जिल्हा पालघर ) येथील मेट्रो फिनिक्स या रुग्णालयाची इमारत अनधिकृत असल्याबाबत

**(२०) ६६६९३ (२३-०८-२०२३). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोईसर-नवापूर नाका ( जिल्हा पालघर ) येथील सर्वे क्र. ५९/ब/१ या जागेवर मालक विकास जैन आणि संदीप जैन यांनी खैरापाडा ग्रामपंचायती कडून घर दुरुस्ती करीत घेतलेल्या ना-हरकत दाखल्याच्या आधारे थेट तीन मजली इमारतीचे बांधकाम केले मात्र या इमारतीच्या बांधकामासाठी त्यांनी जिल्हाधिकारी, जिल्हापरिषद बांधकाम प्राधिकरण तसेच नगररचना विभाग या सारख्या सक्षम कार्यालयां मार्फत कोणतीही आवश्यक बांधकाम परवानगी घेतलेली नाही इतकेच नव्हे तर इमारत अनधिकृत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल आले आहे तसेच पालघर जिल्हापरिषदेच्या आरोग्य विभागाने मेट्रो फिनिक्स रुग्णालयाला या इमारतीत नोंदणी परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर रुग्णालयाने स्थानिक खैरापाडा ग्रामपंचायतीचा ना-हरकत दाखला घेतलेला नसल्याने ग्रामपंचायत खैरापाडा यांनी दिनांक २१ ऑक्टोंबर २०२२ रोजीच्या ठराव क्र. ५१२ अन्वये जिल्हापरिषद पालघर आरोग्य विभागाकडून देण्यात आलेला नोंदणी परवाना रद्द करण्याचा ठराव घेण्यात आलेला आहे, त्याचप्रमाणे या अनधिकृत इमारतीला वीज, पाणी आणि अन्य आवश्यक सुविधा न पुरविण्याबाबत सूचना करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मेट्रो फेनिक्स या रुग्णालया विरोधात ग्रामपंचायतीने केलेल्या ठरावा संदर्भात तसेच इतरांकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषांगाने या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने उक्त मेट्रो फिनिक्स रुग्णालयाच्या वादग्रस्त इमारती संदर्भातील सर्व संबंधित दोषी विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत.?

**श्री. गिरीश महाजन (०२-०१-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे,
(२) हे खरे आहे,
(३), (४) व (५) सदर प्रकरणा बाबत मेट्रो फिनिक्स या रुग्णालया विरोधात ग्रामपंचायतीने केलेल्या ठराव संदर्भात नोटीस क्र,१४७ दि .२२/०९/२०२३ रोजी देण्यात आली आहे.सदर प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

---

## शासनाचा ई-श्रम पोर्टलवर राज्यातील असंघटीत क्षेत्रातील कामगारांच्या सुरक्षिततेबाबत

**(२१) ६६९५९ (२३-०८-२०२३). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाचा ई-श्रम पोर्टलवर राज्यातील असंघटीत क्षेत्रातील अडीच लाख कामगांराची नोंदणी झालेली असून कामगारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून २ लक्ष रुपयाचा अपघात सुरक्षा विमा काढण्यात आल्याबाबतचे वृत्त माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनाने केंद्र शासनाच्या वतीने असंघटीत क्षेत्रातील इमारत बांधकाम कामगार, रिक्षा ओढणारे, ऑटोचालक, सुतार, लोहार, लेव्हलिंग व पकिंग कामगार, घरकाम महिला, शेतमजूर, रस्त्यावरील विक्रेते, दुकानातील नोकर, विडी कामगार, सुतार, वीटभट्टी कामगार, दगडखाण कामगार आदी विविध क्षेत्रातील ३०० कामगारांचा काम करताना अपघाती मृत्यू झाल्यास किवा अपंगत्व आल्यास शासनाकडून २ लक्ष रुपयांचा अपघात सुरक्षा विमा दिल्या जातो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्याचा ई-श्रम पोर्टल असंख्य कामगाराचे आधारकार्ड, बँकेचे चालू खाते, चालू मोबाईल क्रमांक शिक्षण प्रमाणपत्र आदी इत्यादी कागदपत्रे संलग्नीत करताना मोबाईल क्रमांक आधार व बँक खात्याशी लिंक नसल्याने शासनाचा विविध कल्याणकारी योजना व अपघात सुरक्षा विम्याचा लाभ प्राप्त होण्यास तांत्रिक अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील गोर-गरीब ई-श्रम कार्डधारक असंघटीत कामगारांना केंद्र शासनाच्या विविध कल्याणकारी योजनेचा लाभ मिळण्याकरीता ई-श्रम पोर्टलमध्ये सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०८-११-२०२३) :**(१) होय, अंशत: खरे आहे.
(२) असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने असंघटित कामगारांचा राष्ट्रीय डेटाबेस (NDUW) तयार करण्याचा निर्णय केंद्र शासनामार्फत घेण्यात आला होता. त्याअनुषंगाने दि. २६.०८.२०२१ पासून असंघटित कामगारांची नोंदणी ई-श्रम पोर्टल वर सुरू करण्यात आली असून, ई-श्रम पोर्टलवरील नोंदित असंघटित कामगारांना केंद्र शासनाच्या वतीने असंघटित क्षेत्रातील इमारत बांधकाम कामगार, रिक्षा ओढणारे, ऑटोचालक, सुतार, लोहार, लेव्हलिंग व पार्किंग कामगार, घरकाम महिला, शेतमजूर, रस्त्यावरील विक्रेते, दुकानातील नोकर, विडी कामगार, सुतार, विटभट्टी कामगार, दगडखाण कामगार आदी विविध क्षेत्रातील ३४० प्रकारच्या कामगारांचा अपघाती मृत्यू झाल्यास किंवा पूर्णत: अपंगत्व आल्यास दोन लाखाचा विमा तसेच अंशत: अपंगत्व आल्यास एक लाखाचा विमा प्रदान करण्याचे केंद्र शासनाचे धोरण होते. त्याअनुषंगाने ई-श्रम पोर्टलवरील दि. २६.०८.२०२१ ते दि. ३१.०३.२०२२ पर्यंत नोंदित असंघटित कामगारांना अपघाती विमा प्रदान करण्याचा केंद्र शासनामार्फत निर्णय घेण्यात आला आहे.
(३) हे खरे नाही.
(४) ई-श्रम हे पोर्टल केंद्र शासनाचे असून, त्यामध्ये आवश्यक असल्यास सुधारणा करणे केंद्र शासनाच्या अखत्यारित बाब आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**फळसेवाडी (पिसेकापते ) (जि.सिंधुदुर्ग) या दुर्गम भागातील ग्रामस्थ वीज व पिण्याविना वंचित असल्याबाबत**

**(२२) ६७०१९ (२३-०८-२०२३). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फळसेवाडी (पिसेकापते) (जि.सिंधुदुर्ग) या दुर्गम भागातील ग्रामस्थ वीज व पाण्याविना वंचित असल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी ग्रामस्थांनी ग्रामपंचायत पिसेकामते , जिल्हापरिषद व इतर संबंधित विभागाकडे तक्रार करुनही अदयाप दखल घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त ठिकाणी वीज व पाण्याची सोय करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-११-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही

ग्रामपंचायत पिसेकामते येथील फळसेवाडी येथे एकूण ४२ कुटुंबे असून त्यापैकी ३१ कुटुंबांना ग्रामपंचायतीच्या फळसेवाडी नळ पाणी पुरवठा योजनेतून पाणी पुरवठा केला जातो,तसेच फळसेवाडी येथे हितकारी संस्था कार्यरत असून, सदर संस्थेने विहिरी,पंपशेड बांधलेली आहे.त्या विहिरीवरून संबंधित ११ कुटुंबांना पाणी पुरवठा करण्यात येत आहे.सदर वाडी मध्ये ४२ घरे असून सर्व घरांमध्ये वीजपुरवठा देण्यात आलेला आहे.तसेच वाडीमध्ये जाण्या-येण्यासाठी पक्का रस्ता असून वाडीतील ग्रामस्थ वीज पाण्यापासून वंचित असल्याची कोणतीही बाब नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे भाटूंबा (ता. केज, जि. बीड) येथील ग्रामपंचायती मधील संगणक गहाळ असल्याबाबत**

**(२३) ६७०६२ (२३-०८-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भाटूंबा (ता. केज, जि. बीड) येथील ग्रामपंचायती मधील संगणक गेली सहा ते सात वर्षापासून गहाळ असून याबाबत भाटूंबा येथील सरपंच श्री, शिवकिरण धपाटे यांनी तहसील कार्यालयासमोर ६ दिवस उपोषण केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपोषणा नंतर तत्कालीन ग्रामसेवक श्री, सोनवणे यांनी सध्याच्या ग्रामसेवकांकडे संगणक जमा केले परंतू श्री, सोनवणे यांनी दिलेले संगणक व त्यावेळीच्या संगणकामध्ये तफावत असल्याचे म्हणजे संगणक हे दुसरेच आणून दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर संगणक हे सहा वर्षापासून गहाळ असतानाही संगणक ऑपरेटरला सहा वर्षाचा पगार देण्यात आला त्याप्रकरणी सदर संगणक कोणी नेले तसेच ते ग्रामपंच्यातमध्ये का नव्हते याबाबत चौकशी करून तत्कालीन सरपंच, ग्रामसेवकावर कार्यवाही करणेबाबत व सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्या नियमबाह्य भूमिकेची उच्चस्तरीय चौकशी करणे बाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. ग्रामविकास मंत्री यांचेकडे दिनांक ३ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारस निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने संबंधीत दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२१-०२-२०२४) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) या प्रकरणी जिल्हा परिषदेने नियुक्त केलेल्या चौकशी समितीने दिलेल्या अहवालानुसार ग्रामपंचायत साठा नोंदवहीत संगणकाची नोंद दिसून आली नाही. त्यामुळे सध्या ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध असलेला संगणक व मूळ संगणक संच कोणता होता याची खात्री करता आली नाही.
(३) होय हे खरे आहे.
श्रीमती नमिता मुंदडा, मा.वि.स.स. यांनी मा. ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दिनांक ३०.०५.२०२३ रोजी निवेदन दिले आहे.
(४) संबंधित ग्रामसेवक श्री.सोनवणे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली होती. सदर नोटीसच्या खुलाशामध्ये श्री.सोनवणे यांनी संगणक व प्रिंटर दि.१९/०१/२०२१ रोजी पंचायत समिती, केज येथे जमा केला असल्याचा खुलासा सादर केला असून संगणक जमा केल्याचे पत्र सादर केले. श्री.सोनवणे, ग्रामसेवक यांना या प्रकरणी बजावलेल्या नोटीशीबाबत त्यांना सादर केलेला खुलासा असमाधानकारक असल्याने सहाय्यक आयुक्त (चौकशी) विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे विभागीय चौकशी प्रस्तावित केलेली आहे.
(५)प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विद्यार्थी आणि पालकांना करिअर विषयक विविध संधीची माहिती हेल्पलाइन नंबर, ईमेल द्वारे सुरु करणेबाबत

**(२४) ६७६८९ (२३-०८-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विद्यार्थी युवक, युवती आणि पालकांना करिअर विषयक विविध संधीची माहिती घरबसल्या कायमस्वरूपी हेल्पलाइन नंबर, ईमेल द्वारे सुरू करण्यात येणार असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येत्या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मधील (आयटीआय) विद्यार्थ्यांना दरमहा पाचशे रुपये विद्या वेतन (स्टायपेंड) देण्यात येईल अशी घोषणा कौशल्य रोजगार उद्योजक्ता व नाविन्यता मंत्री महोदयांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कौशल्य विकास विभाग अंतर्गत असलेले व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालया मार्फत राज्यातील सर्व जिल्हे आणि २८८ विधानसभा मतदारसंघात छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०३-११-२०२३) :** (१) राज्यातील नोकरी इच्छुक उमेदवार, उद्योजक, प्रशिक्षण संस्था, शासनाचे विविध विभाग, शासनाच्या स्वयंरोजगार योजना राबविणारी महामंडळे, सेवा पुरविणारे व सेवा घेणारे इ. लाभार्थी घटक (स्टेक होल्डर्स) यांना रोजगार, करिअर विषयक विविध संधीची माहिती, स्वयंरोजगार व प्रशिक्षणाबाबतच्या विविध सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता www.rojgar.mahaswayam.gov.in हे पोर्टल कार्यान्वित आहे. सदर पोर्टलवरील सेवाचा वापर करताना या लाभार्थी घटकानां येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी १८००१२०८०४० या क्रमांकाची हेल्पलाईन दि.१८.०८.२०२३ पासून सुरु करण्यात आली आहे. तसेच, support@ese.maharashtra.gov.in ही ई-मेल सेवा सुरु करण्यात आली आहे.
(२) होय.
शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, अल्पसंख्याक व खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या मागास प्रशिक्षणार्थी ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न

₹८ लक्षच्या मर्यादेत आहे अशा सर्व प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून दरमहा ₹५००/- इतके विद्यावेतन देण्याबाबत मंत्रिमंडळाच्या दि. १८.०८.२०२३ च्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे.
(३) होय.

दि. ०६ मे, २०२३ ते ०६ जून, २०२३ या कालवधीत इयत्ता १० वी व १२ वी नंतर शिक्षणाच्या संधी, अभ्यासक्रम, प्रवेश परीक्षा यासाठी मार्गदर्शक व्याख्याने इत्यादींसाठी छत्रपती राजर्षी शाहू युवाशक्ती करिअर शिबिरांचे आयोजन करण्यात आले. आजमितीस एकूण २५९ ठिकाणी शिबिरे संपन्न झाली. या शिबिरांत १,७४,६३८ विद्यार्थी आणि १५,४१३ पालकांनी सहभाग घेतला.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खोणी (ता. कल्याण जि.ठाणे) येथील ग्रामस्थांना पाण्याची सोय तसेच अन्य मुलभूत सोयी - सुविधा करणेबाबत

**(२५) ६७७४४ (२३-०८-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खोणी (ता. कल्याण जि.ठाणे) ग्रामपंचायतीमधील ग्रामस्थांना हंडाभर पाण्यासाठी रात्र जागून काढावी लागत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खोणी तसेच वडवली या भागात मोठ्या प्रमाणात शहरीकरण होत असून अनेक मोठमोठे गृह प्रकल्प उभे राहत असताना तेथील स्थानिक नागरिकांना पिण्याच्या पाण्याच्या व अन्य मूलभूत सेवा - सुविधा न पुरवण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर स्थानिक नागरिकांना पाणी व अन्य मूलभूत सेवा-सुविधा मिळणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (३१-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

मौजे खोणी व वडवली या गावांची लोकसंख्या सन २०११ नुसार अनुक्रमे २१०७ व ६२८ इतकी असनू, सदर गावांची सध्याची लोकसंख्या ३५०० पर्यत आहे. महाराष्ट्र औद्यागीक महामंडळाच्या जलवाहिनीवरुन जलजोडणी असून, सदर जलजोडणीव्दारे दोन्ही गावांना नळ योजना कार्यान्वित आहेत. गावात जुनी वितरण वाहीनी कार्यान्वित असल्यामुळे गावातील काही भागात पाणी पुरवठयाचा दाब कमी असल्याने तेथील ग्रामस्थांना अपुरा पाणी पुरवठा झाला होता. ग्रामपंचायतीने सदर भागात टँकर ने पाणी पुरवठा केला होता. तसेच ग्रामपंचायतीने ग्रामस्थांना हंडाभर पाण्यासाठी रात्र जागुन काढावी लागलेली नाही असे लेखी निवेदनाव्दारे कळविले आहे.
(२) खोणी - वडवली गावांना व या भागात उभारण्यात येणाऱ्या गृह प्रकल्पांना महाराष्ट्र औद्यागीक महामंडळाच्या जलवाहिनीवरुन स्वतंत्र जल जोडणी घेऊन पाणी पुरवठा करण्यात येत आहे.
(३) जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत खोणी व वडवली या गावांना नळ पाणी पुरवठा योजना सुधारणा करण्याचे रु. १४८.७४ लक्ष किंमतीचे काम मंजूर असून सदर योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. या योजनेव्दारे ग्रामस्थांना ५५ लिटर दरडोई पाणी पुरवठा करण्याचा समावेश आहे. यामुळे ग्रामस्थांना कायमस्वरुपी पाण्याची सोय होणार असून, समान दाबाने पाणी पुरवठा होऊन पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केज (जि. बीड) नगरपंचायत मार्फत प्रस्तावित पाणीपुरवठा योजनेतील जल शुद्धीकरण केंद्रास जागा उपलब्ध करणेबाबत**

**(२६) ६७७५७ (२८-०८-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) "जल जीवन मिशन "हा शासनाचा महत्वकांक्षी व कालबद्ध कार्यक्रम असल्याने ग्रामीण पाणी पुरवठा योजनाच्या उपयोगाकरीता पाणी पुरवठा योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेने अन्य शासकीय विभाग/ स्थानिक स्वराज्य संस्था याच्या आधिपत्याखालील जमिनीची मागणी केल्यास संबंधित विभाग/स्थानिक स्वराज्य संस्थानी सदर जागेसाठी मालकी हक्क हस्तांतरित न करता ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या उपयोगाकरिता ना-हरकत दाखला त्यांच्या `स्तरावर उपलब्ध करून द्यावा असा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केज नगरपंचायत मार्फत प्रस्तावित पाणीपुरवठा योजनेच्या जल शुद्धीकरण केंद्राकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या मालकीच्या केज शहराच्या हद्दीतील भूमापन क्र. २३७ मध्ये अंदाजे एकूण २.५० एकर (१०० मी बाय १०० मी) जागेसाठी ना हरकत दाखला देण्याची मागणी मुख्याधिकारी, नगर पंचायत, केज यांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,बीड यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर जल शुद्धीकरण केंद्राकरिता जागा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२२-०२-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) मागणी करण्यात आलेली जागा ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (नावाने) मालकीची असून,भविष्यात सदर जागा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वरिष्ठ कार्यालयाकडून विकसित करणे विषयीची बाब विचाराधीन आहे.त्यामुळे केज शहराच्या हद्दीतील भूमापन क्र.२३७ मधील अंदाजे २.५० एकर जागा केज नगर पंचायतीस हस्तांतरित करता येऊ शकणार नाही, असे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मुख्याधिकारी नगर पंचायत केज यांना कळविले आहे. तरी सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या जल शुद्धीकरण केंद्रातील उपलब्ध जागेत केज शहराचे प्रस्तावित जल शुद्धीकरण केंद्र घेणे योग्य राहणार आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**तळेगाव (जि. पुणे) येथील औद्योगिक क्षेत्रात मूलभूत सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(२७) ६७८१६ (३१-०८-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेगाव (जि. पुणे) येथील औद्योगिक क्षेत्रात सर्वाधिक वस्तू आणि सेवा कर जीएसटी भरणा करणाऱ्या चाकण औद्योगीक क्षेत्रात खड्डे मुक्त रस्ते, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक स्वच्छता, अखंडित वीजपुरवठा इत्यादी मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यावर हॉटेल व्यवसायिक, चिकन विक्रेते, भंगार व्यावसायिक आणि काही लघुउद्योगांच्या गलीच्छपणामुळे चाकण एमआयडीसी परिसरात सर्वत्र रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे ढीग दिसत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत एमआयडीसी प्रशासन आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कारवाई करून कचरा व्यवस्थापनासाठी ठोस उपाययोजना होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर एमआयडीसीमध्ये मूलभूत सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०९-११-२०२३) :** (१)हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

या भागात स्वच्छता वेळोवेळी केली जात असून, रस्त्यालगत हॉटेल व्यावसायिक, चिकन विक्रेते,भंगार इत्यादी अतिक्रमणे वेळोवेळी पोलीस खात्याच्या सहकार्याने काढून औद्योगिक क्षेत्रातील कचऱ्याची स्वच्छता करण्यात येते.

(३) व (४) हे खरे नाही.

चाकण औद्योगिक क्षेत्रात मुलभूत सुविधांतर्गत बहुतांश रस्ते व जलवितरणाची कामे पुर्ण झालेली आहेत.मऔवि महामंडळातर्फे रस्ते सुस्थितीत ठेवण्याकरीता गरजेनुसार कामे केली जातात. कचरा व्यवस्थापनाकरीता महामंडळातर्फे अघातक कचरा एकत्रीकरण,साठवण, प्रक्रिया व विल्हेवाट लावण्याकरीता प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर तळेगाव, चाकण व तळवडे औद्योगिक क्षेत्रातील कचऱ्याचा प्रश्न सोडविण्यास मदत होईल. आजमितीस कचरा संकलन करुन विल्हेवाट लावणेकरीता सार्वजनिक स्वच्छेतेकरीता वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत वेळोवेळी स्वच्छता केली जात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात इंदिरा आवास, शबरी घरकुल,व रमाई घरकुल योजनेंचा चा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांना पुन्हा घरकुलांचा लाभ मिळण्याबाबत

**(२८) ६७९४० (२३-०८-२०२३). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इंदिरा आवास योजना, शबरी घरकुल योजना व रमाई घरकुल योजनेतून तब्बल २५ ते ३० वर्षापुर्वी बांधण्यात आलेली लाभार्थ्यांची घरे जुनी, जिर्ण व पडक्या अवस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंतप्रधान आवास योजना (ग्रामीण) च्या सर्वेक्षण व मोका तपासणी नुसार या लाभार्थ्यांचे नाव घरकुलांच्या यादीत येवूनही त्यांना घरकुलांचा लाभ देण्यात येत नसल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्यदरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर धोरणात्मक निर्णय घेवून इंदिरा आवास योजना, शबरी घरकुल योजना व रमाई आवास योजनेतून २५ ते ३० वर्षापूर्वी लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांना नविन घरकुलाचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण ही केंद्र शासनाची योजना असल्यामुळे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे व इतर राज्य योजना, राज्यात राबविण्यात येतात. तसेच पूर्वीच्या इंदिरा आवास योजनेंअतर्गत लाभ घेतलेल्या पंरतू ते घर राहण्यायोग्य नसलेल्या लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्याची तरतुद केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेमध्ये नाही. तरीही इंदिरा आवास योजनेचा लाभ घेतलेल्या ज्या लाभार्थ्यांची घरे जिर्ण व पडक्या अवस्थेत आहेत त्यांना प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण मध्ये समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे दि. १४.०१.२०२२ व दि. ०६.०७.२०२३ च्या पत्रान्वये सादर केला आहे. अद्याप केंद्र शासनाने याबाबत काही कळविलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य पाणी व स्वछता मिशनच्या कार्यक्रमांमध्ये झालेली अनियमिततेतता

**(२९) ६९०७२ (२३-०८-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या कार्यक्रमांमध्ये अनेक प्रकारच्या झालेल्या अनियमिततेतिची चौकशी करण्याबाबत मुख्य सचिव तथा अध्यक्ष राज्य पाणी व स्वच्छता मिशन शिखर समिती यांना विधानसभा सदस्य यांनी दिनांक २० एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारस यांनी लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना दिनांक ४ सप्टेंबर २०२० या योजनेचा शासन निर्णय क्रमांक जजमि २०१९/प्र.क्र.१३८/पापु-१० (०७) नुसार त्यांनी उपस्थित केलेला पाच विविध मुद्द्यांबाबतचा तपास पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रार पत्रात नमूद केलेल्या पाच विविध मुद्द्यांमध्ये नमूद केलेल्या बाबींचा तपास करताना बैठकीमध्ये वा समितीने घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही झाली नसल्याचा करण्यात आलेला आरोपाबाबत सत्यता तपासणीत निदर्शनास आले आहे काय,

(४) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर पत्रात नमूद केलेल्या पाच विविध मुद्द्यांचा तपास पूर्ण झाला तपास पूर्ण झाला नसल्यास विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधीत व्यक्तीविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (३१-१०-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

मा. विधानसभा सदस्य यांनी मा. मुख्य सचिव तथा अध्यक्ष राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांना दिनांक २० एप्रिल, २०२३ रोजीचे निवेदन दिले आहे.

(२), (३) व (४)

मा. विधानसभा सदस्यांनी त्यांच्या निवेदनात उपस्थित केलेल्या मुद्द्यांबाबत जल जीवन मिशन कार्यक्रमाची अंमलबजावणी यंत्रणा - राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांच्या मार्फत अहवाल मागविण्यात आला असून, सदर अहवालामध्ये मा. विधानसभा सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना स्पष्टीकरण /य देण्यात आलेले आहेत.

सदरचा अहवाल मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्या मान्यतेने व मा. मुख्य सचिव यांच्या निर्दशनास आणून मा. विधानसभा सदस्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने वस्तुस्थितीदर्शक अहवाल दिनांक १७.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मा. विधानसभा सदस्यांना कळविण्यात आला आहे.

जल जीवन मिशन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीदरम्यान सर्व योजना, सल्लागारांची व संस्थांची नियुक्ती संबंधति शासन निर्णय, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमधील तरतुदी अन्वये करण्यात आली आहे. सर्व प्रक्रियांना वेळोवेळी सक्षम प्राधकिारी तसेच प्राकृत समित्यांची मान्यता घेण्यात आल्या आहे. जल जीवन मिशन कार्यक्रमाच्या कालमर्यादीत अंमलबजावणीसाठी घेण्यात आलेले सर्व निर्णय लोकाभमुिख लोकामुव जनहितार्थ तसेच राज्यातील सर्व ग्रामीण जनतेस मार्च, २०२४ पर्यंत घरगुती नळ जोडणी देण्याच्या उद्देशाने घेण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोराड (ता.वाडा , जि. पालघर) या गावात खेकडा पालन करण्यासाठी बांधण्यांत येत असलेल्या संरक्षण भिंतीखाली दोन मजुरांचा झालेले मृत्यू

**(३०) ६९१३८ (२५-०८-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोराड (ता.वाडा, जि. पालघर) या गावात खेकडा पालन करण्यासाठी विहिरीच्या संरक्षण भिंतीचे काम सुरु असतांना बळीराम तुबंडा व बारकू शिरोदे या दोन मजूरांच्या अंगावर संरक्षण भिंत पडल्याने दिनांक ३० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दुर्घटनेमध्ये मृत झालेल्या दोन मजूरांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली असून विहिर मालकांनी त्या कुटुंबियांना कोणतीही आर्थिक मदत केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर मृत झालेल्या दोन मजुरांच्या परिवारास आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (३१-१०-२०२३) :** (१) शेतमालक श्री. किसन बालू काचरे यांचे सर्वे नं ६१/२६, गौराड, ता.वाडा, जि. पालघर या ठिकाणी शेत असून माहे एप्रिल २०२३ पासून त्यांच्या शेतात ३३ x ३३ फूट आकाराचे व उंची ८ फुट असलेले सिमेंट व विटाने शेततलावाचे बांधकाम करण्यात येत असून त्या कामासाठी ८ कामगार काम करीत होते. कामाच्या ठिकाणी दि.२९.०५.२०२३ रोजी सायंकाळी ६.०० वाजताच्या दरम्यान, एका बाजूची भिंत कोसळून झालेल्या अपघातामध्ये बळीराम किसन तुंबडा, वय वर्ष ५३, व बारकु बाळू शिलोंदे, वय वर्षे ५७ या कामगारांचा ढिगाऱ्याखाली दबल्याने मृत्यू झाला.
(२) हे खरे नाही.

संबंधित शेत मालकाने मृत कामगारांच्या वारसासोबत आपसात समझोता करून मयत कामगारांच्या वारसाला प्रत्येकी २ लक्ष रुपये धनादेशाद्वारे अदा केलेले आहेत.
(३) सदर घटनेबाबत वाडा पोलिस ठाणे, जिल्हा पालघर येथे अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे. किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत मालकाविरुद्ध मा.वाडा न्यायालयात खटला क्र.SCC/१६२/२०२३ दाखल करण्यात आलेला आहे.

कर्मचारी नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ नूसार मृत कामगारांच्या वारसांना नुकसान भरपाईची रक्कम देण्याबाबत संबंधित शेतमालक यांना दि.०५.०६.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे सूचना देण्यात आली आहे. तसेच मा. कामगार न्यायालय, ठाणे यांना मृत कामगारांच्या वारसांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी उचित कार्यवाही करण्याबाबत दि.०५.०६.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जल जीवन मिशन अंतर्गत जलकुंभाचे खोदकाम पाण्याची उपलब्धता विचारात न घेता करण्यात येत असल्याबाबत

**(३१) ६९१४१ (२३-०८-२०२३). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेवराई विधानसभा मतदारसंघातील जल जीवन मिशन अंतर्गत लाखो रुपये खर्च करून गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी खोदण्यात येणारे जलकुंभ (विहिरी) कंत्राटदाराच्या सोयीच्या ठिकाणी किंवा गावातील एखाद्या प्रभावी व्यक्तीच्या सोयीच्या ठिकाणी खोदल्या जात असल्याच्या अनेक तक्रारी लोकप्रतिनिधी सह ग्रामस्थांनी दिल्या असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, अनेक ठिकाणी अशा पद्धतीने विहिरीचे खोदकाम केल्यामुळे विहिरीला पाणी लागले नसल्याचे अनेक तक्रारी मधून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जेथे पाण्याची उपलब्धता आहे अशाच ठिकाणी विहिरीचे खोदकाम व्हावे यासाठी ग्रामसभा बोलावून सर्व ग्रामस्थांच्या उपस्थितीत जल कुंभाची जागा निश्चित व्हावी यासाठी शासनाने प्रशासनास काही निर्देश दिले आहेत काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. २३२ (20)

**श्री. गुलाबराव पाटील (०२-११-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२) वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालयाने निश्चित केलेल्या १६० स्थळी विहीरी खोदल्या असता गेवराई तालुक्यातील पाच विहीरींना कमी पाणी लागले आहे.

(३) वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालयाकडून अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावित केल्यानुसार त्या जागेचे अक्षांश व रेखांश या बाबीची शहानिशा करून सरपंच व गावातील नागरीक, ठेकेदार व त्यांचे प्रतिनिधी यांच्या समक्ष जागा निश्चित करून उद्भव निश्चित केला जातो.

(४) वरिष्ठ भूवैज्ञानिक भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्यासमवेत व उप अभियंता व त्यांचे अधिनस्त अभियंते यांनी कोरड्या गेलेल्या विहीरीची पाहणी केलेली असून, तद्नंतर नवीन ठिकाणी उद्भवाची जागा निश्चित करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वरोरा-चिमूर ( जि.चंद्रपूर) तालुक्यातील गावांच्या रस्त्यांच्या झालेल्या दुरावस्थेबाबत

**(३२) ६९५५७ (२५-०८-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा-चिमूर (जि.चंद्रपूर) तालुक्यातील गावांच्या रस्त्यांची दुरावस्था झाल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरोरा येथील शेगाव ते दादापुर, धानोली, कोकेवाडा तु.अजुनी ते वायगांव, भोयर, बेबडा या रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले त्याअनुषंगाने सदरील गावांतील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-११-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) वरोरा-चिमूर (जि.चंद्रपूर) तालुक्यातील गावांच्या रस्त्यांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र | रस्त्याचे नाव व क्रमांक रस्त्याची | एकूण लांबी (कि.मी.) | सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| १. | शेगाव ते दादापूर, ग्रामा-१४८ | २.०० | रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक. |
| २. | दादापूर ते धानोली, ग्रामा-१४५ | ४.०० | रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक. |
| ३. | धानोली ते कोकेवाडा, ग्रामा ५४ | २.०० | सा.क्र.०/०० ते १/५०० मधील रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. |
| ४. | अर्जुणी तु. ते वायगांव (अवर्गीकृत) | -- | योजनाबाह्य स्वरुपाचा रस्ता असल्याने रस्ते व पूल दुरुस्तीच्या योजनांमध्ये दुरुस्ती करता येत नाही. |
| ५. | राळेगाव ते बेंबळ, ग्रामा-१५४ | २.०० | सदर रस्त्यावर रु.४०.०० लक्षचे काम जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मंजूर असून प्रगतीत आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | चारगाव (खु.) ते वायगाव (भो.), ग्रामा-१४८ | ३.५० | सदर रस्त्यावर रु.४३.०० लक्षचे काम जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मंजूर असून प्रगतीत आहे. |
| ७ | वायगाव (भो.) ते चिमूर, ग्रामा-१५० | २.०० | सदर रस्त्याची संपूर्ण लांबी डांबरी पृष्ठभागाची असून किरकोळ खड्डे दुरुस्ती करणे आवश्यक आहे. |
| ८ | बेंबळ ते वायगाव (खु.), ग्रामा-१५२ | ४.५० | सदर रस्त्याची संपूर्ण लांबी डांबरी पृष्ठभागाची असून सुस्थितीत आहे. |

उपरोक्त रस्त्यांच्या नादुरुस्त लांबीची कामे रस्ते व पूल दुरुस्तीच्या योजनांमध्ये प्रस्तावित करण्याच्या सूचना जिल्हा परिषदेला देण्यात आल्या आहेत. निधीच्या उपलब्धतेनुसार सदर कामे हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यात ग्रामपंचायतींच्या स्मशानभूमीत शेड नसल्याने उघडल्यावरच अत्यंसंस्कार करावे लागत असलेबाबत

**(३३) ६९५६० (२५-०८-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात ८४६ ग्रामपंचायती पैकी १९३ ग्रामपंचायतींच्या स्मशानभूमीत अजूनही शेड नसल्याने उघडल्यावरच अत्यंसंस्कार करावे लागत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींनी स्मशानभूमी शेड, स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता, दिवाबत्ती इत्यादी करीता शासनाकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी पुरेशा सुविधा तातडीने उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-११-२०२३) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) ग्रामपंचायतींना जनसुविधांसाठी विशेष अनुदान अंतर्गत स्मशानशेड, स्मशानभुमीकडे जाणारा रस्ता, दिवाबत्ती इ. ग्रामपंचायतीची मागणी जिल्हा वार्षिक योजनेच्या आराखडयात समाविष्ट असून सदर आराखडा जिल्हा वार्षिक योजनेत समाविष्ट करण्याकरीता जिल्हा नियोजन समितीकडे सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील एमआयडीसीमधील लाखो उद्योजकांना तब्बल ८० सेवांसाठी सहा वर्षापासूनचा वस्तु व सेवा कर (जीएसटी) व्याज आणि दंडासह भरण्याची नोटीस पाठविल्याबाबत

**(३४) ६९७०५ (३१-०८-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २८९ एमआयडीसीमधील लाखो उद्योजकांना तब्बल ८० सेवांसाठी मागील सहा वर्षापासूनचा (जीएसटी) व्याज आणि दंडासह भरण्याची नोटीस महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळाने (एमआयडीसी) पाठविलेली असल्याने उद्योजकांमध्ये असंतोष निर्माण झाला असल्याचे दिनांक २० जून,२०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत राज्यातील उद्योग संघटनाच्या ऑनलाईन झालेल्या बैठकीत पाण्याचे बिल वगळता इतर कोणतेही शुल्क न भरण्याचा निर्णय घेतलेला आहे हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी योग्य ती कार्यवाही होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०९-११-२०२३) :**
(१) मऔवि महामंडळाने ३७८.३६ कोटी इतका वस्तू व सेवा कर आणि ३५५.४४ कोटी इतके व्याज भरण्याचा निर्णय घेतला असून त्याची संबंधित ग्राहकांकडून वसुली करणे करीता दि. ०१/०६/२०२३ रोजीचे परिपत्रक क्र. I११८४ नुसार मऔवि महामंडळाच्या अधिनस्त सर्व कार्यालयांना सूचित करण्यात आले आहे.
(२) व (३)दि. २४/०६/२०२३ रोजी तळोजा इंडस्ट्रीयल असोसिएशन बरोबर झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने मा.अध्यक्ष, मऔविम यांनी पाणी देयकातून दि. ०१/०६/२०२३ च्या परिपत्रक क्र. I११८४ अन्वये दि. ०१/०७/२०१७ ते ०४/०९/२०२२ या कालावधीसाठी मागणी केलेली वस्तु व सेवा कराची रक्कम वगळण्याचे निर्देश दिले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील हॉटेलमध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी 'महाराष्ट्र हॉटेल कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करणेबाबत**

**(३५) ७००९२ (२५-०८-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागातील युवक कोणतेही उपजिवेकेचे साधन नसल्यामुळे मुंबई, पुणे, नागपुर, नाशिक, औरंगाबाद यासह सर्वच मोठया शहरांसह जिल्हयाच्या ठिकाणी व ग्रामीण भागातील शेकडो कामगार लहान-मोठया हॉटेलमध्ये अल्प वेतनावर काम करत असल्याची बाब सन २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या क्षेत्रामध्ये (हॉटेल) काम करणाऱ्या सर्वच कामगारांना कोणत्याही प्रकारच्या सोयी-सुविधा संबंधित हॉटेलमालक यांचेकडून पुरविण्यात येत नाहीत. हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परिणामी एखादा कामगार आजारी असेल किंवा त्यांच्या कुटूंबामध्ये एखादा कठीण प्रसंग उभारल्यास त्या कामगाराला कामावरून कमी केले जात असल्याने. तुटपुंज्या पगारावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना यामुळे फार मोठया आर्थिक संकटाला सामोरे जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील हॉटेलमध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी 'महाराष्ट्र हॉटेल कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ६ जून,२०२३ रोजी वा त्या सुमारास वि.स.स. यांनी लेखी पत्रा द्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदअनुषंगाने "महाराष्ट्र हॉटेल कामगार कल्याणकारी" मंडळाची स्थापना करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०१-०१-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२), (३),(४),(५) असंघटित क्षेत्रातील कामगारांना कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी मंडळे स्थापन करण्याबाबत लोकप्रतिनिधी तसेच विविध कामगार संघटनांमार्फत सातत्याने मागणी होत असल्याने "असंघटित कामगार कल्याण महामंडळ" व व्यवसाय/उद्योगक्षेत्र निहाय ३९ आभासी मंडळे स्थापन करण्याचा प्रस्ताव मा. मंत्रीमंडळाच्या दि. २८/०६/२०२३ रोजीच्या बैठकीत मंजूर करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने याबाबतचा शासननिर्णय दि. ०६/०७/२०२३ रोजी निर्गमित करण्यात आलेला असून, त्यातील परिशिष्ट-१ मध्ये नमूद अनुक्रमांक ११ मध्ये

आदरातिथ्य सेवासंबधित उद्योगामध्ये हॉटेल कामगारांचा समावेश करण्यात आलेला आहे. भविष्यात या महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी योजनांचे लाभ हॉटेल कामगारांना तसेच त्यांच्या कुटुंबियांना देण्यात येणार आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी संवर्गातील प्रशासकीय बदल्याबाबत

**(३६) ७०११३ (२५-०८-२०२३). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी संवर्गातील प्रशासकीय बदल्याबाबतचे निवेदन महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना दिनांक २१ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाची शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-०१-२०२४) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) प्रस्तुत निवेदनान्वये ग्रामसेवक संवर्गाच्या प्रशासकीय बदल्या न करता विनंती बदल्या करण्यात याव्यात अशी विनंती केली आहे. तथापि, शासनाच्या दि. १२ मे, २०२३ रोजीच्या पत्रान्वये शासन निर्णय दि. १५ मे, २०१४ मधील प्रकरण दोन जिल्हास्तरीय बदल्या, मुद्दा क्र.३(अ)मधील (१) व (२) आणि मुद्दा क्र.३ (ब) मधील (१) व (२) नुसार कार्यवाही करण्याच्या सूचना असल्यामुळे समुदेशनाने दि. १५.५.२०२३ रोजी प्रशासकीय बदल्यांची कार्यवाही जिल्हा परिषदेने केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यात जलजीवन मिशन अभियानांतर्गत कामांना उदभवणाऱ्या समस्यांचे निरसन होणेबाबत

**(३७) ७०१२६ (२१-०२-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यात जलजीवन मिशन अभियानांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत १२ पाणी योजना राबविण्यात येत असून सुमारे ४०० कोटीच्या या योजना सन २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, सदर योजनेअंतर्गत निम्म्या योजनांचे काम प्रगतीपथावर असले तरी उद्दिष्ट साध्य करण्यासाठी खाजगी जागा मिळविण्यापासून ते विविध परवानग्या तसेच महामार्गाच्या खोदाईचा प्रश्न, सार्वजनिक बांधकामाचा रोड डॅमेजच्या निधीचा प्रश्न असे अनेक तांत्रिक अडचणींमुळे रत्नागिरी जिल्ह्यात अद्यापही पाणी प्रश्न गंभीर आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, काही गावांतील जलजीवन मिशनअंतर्गत योजनेची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे अंदाजपत्रक तयार करताना अनेक त्रुटी असून या त्रुटींची पूर्तता करणेकरीता जादा निधीची तरतूद शासन पूर्ण करणार काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर अभियानातंर्गत रत्नागिरी जिल्ह्यात पाणी योजनांची उद्दिष्ट वेळेत पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव पाटील (१८-१२-२०२३) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
म.जी.प्रा. मार्फत १२ पाणी पुरवठा योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. उपांगासाठी लागणाऱ्या जागा काही

ठिकाणी शासकीय आहेत. तर काही ठिकाणी खाजगी शासकीय जागा प्राप्त करुन घेण्यात आल्या आहेत. खाजगी जागांचे बाबतीत पाठपुरावा सुरु आहे. सर्व योजनांची कामे विहीत कालावधीत पुर्ण करण्याचे प्रयत्न सुरु आहे.
(३) प्रत्यक्ष काम करतांना कार्यक्षेत्रावरील अडचणींमुळे तांत्रिक बदल करणे आवश्यक असल्याने योजना सुधारीत करुन मंजूरी घेण्यात येत आहे.
(४) जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनांची उद्दीष्टे पूर्ण करण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावरुन नियमित आढावा बैठका घेण्यात येऊन क्षेत्रिय यंत्रणांना योजना विहीत कालावधीत पूर्ण करण्याकरीता पाठपुरावा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगणा व बुटीबोरी एम.आय.डी.सी. क्षेत्रातील नाला खोलीकरण, रूंदीकरण कामासाठी निधी मंजूर करणेबाबत

**(३८) ७०२१७ (२८-०८-२०२३). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणा व बुटीबोरी एम.आय.डी.सी. क्षेत्रातील नाला खोलीकरण, रूंदीकरण कामासाठी निधी मंजूर करणेबाबत जिल्हाधिकारी यांना लोकप्रतिनिधीनी दिनांक २० मे,२०२३ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्र दिले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नाला खोलीकरण व रूंदीकरण कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०९-११-२०२३) :** (१) व (२) हिंगणा व बुटीबोरी एम.आय.डी.सी. क्षेत्रातील नाला खोलीकरण,रुंदीकरण कामासाठी निधी मंजूर करणेबाबत जिल्हाधिकारी यांना लोक प्रतिनिधींनी दि.२० मे,२०२३ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्र दिल्याबाबतची माहिती मऔवि महामंडळ तसेच उद्योग विभागातील दप्तरात आढळून येत नाही.
तथापि, हिंगणा व बुटीबोरी एम.आय.डी.सी. क्षेत्रातील नाला खोलीकरण व रुंदीकरणाच्या कामाकरीता रितसर निविदा काढुन सदर कामावर अनुक्रमे रु.९ लक्ष व रु.२६ लक्ष इतका खर्च करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळात कार्यरत असलेल्या अधिक्षक अभियंता श्री.राजेंद्र केंद्रे यांनी औरंगाबाद यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(३९) ७०४०५ (३१-०८-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळात कार्यरत असलेल्या अधिक्षक अभियंता श्री.राजेंद्र केंद्रे यांनी औरंगाबाद, नवी मुंबई सह व इतर मोठया शहरांमध्ये औद्योगिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना निवासी भूखंड वाटप करताना अनेक भूखंड व सदनिका स्वतःच्या व कुटुंबातील इतर व्यक्ती तसेच नातेवाईकांच्या नावाने घेतल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौकशीत महाराष्ट्र ओद्योगिक विकास महामंडळाचे अधिक्षक अभियंता श्री.राजेंद्र केंद्रे यांनी किती भूखंड व सदनिका हडप केल्याचे निदर्शनास आले तदनुसार प्रशासकीय पदाचा गैरवापर करून भ्रष्टाचार करणाऱ्या श्री.केंद्रे यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०९-११-२०२३) :**(१) हे खरे नाही.
श्री.राजेंद्र केंद्रे हे नियत वयोमानानुसार दि.३०.०४.२०२३ रोजी मऔवि महामंडळाच्या सेवेतून सेवा निवृत्त झाले आहेत.

वि.स. २३२ (25)

औरंगाबाद औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्र.आर-१४ महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या चक्रपाणी सहकारी गृहनिर्माण संस्था यांना तत्कालीन प्रादेशिक अधिकारी यांचेमार्फत दि.१९.११.१९९१ रोजी तत्कालीन प्रचलित दरानुसार भूखंड वाटप करण्यात आला आहे. सदर जागेचा प्राथमिक करारनामा दि.९.१२.१९९१ रोजी करण्यात आला असून, सदर सोसायटीत श्री.आर.व्ही.केंद्रे सभासद असून त्यांचे नावे एक सदनिका आहे.

३.चिकलठाणा औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्रमांक RH-३ महामंडळाचे अधिकारी /कर्मचारी यांची साई सागर हाऊसिंग सोसायटी यांना तत्कालीन प्रादेशिक अधिकारी यांच्यामार्फत तत्कालीन प्रचलित दरानुसार भूखंड वाटप करण्यात आला आहे.

सदर जागेचा प्राथमिक करारनामा दि.१.११.१९९९ रोजी करण्यात आला असून पुर्व अंतिम करारनामा दि.१९.०५.२००० रोजी करण्यात आला आहे. सदर सोसायटीत श्री. आर. व्ही.केंद्रे सभासद होते. त्यांचे नावे एक सदनिका होती. तथापि, सदर सोसायटीतील सदनिका दि.२७.१०.२००९ रोजी श्री.प्रमोद लक्ष्मण गाढे यांचे नावे हस्तांतर करण्यात आलेली आहे. याव्यतिरिक्त मऔवि महामंडळाच्या उर्वरित औद्योगिक क्षेत्रात श्री.आर.व्ही.केंद्रे यांना निवासी भूखंड अथवा सदनिका वाटप केलयाचे दिसून येत नाही.

(२) प्रस्तुत प्रकरणी श्री.अमोल कांबळे, RTI Actvist यांनी दि.२७.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये तक्रार दाखल केली होती. त्यानुषंगाने करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीत श्री.आर.व्ही.केंद्रे यांच्याबाबत प्राप्त झालेलया तक्रारीत कोणतेही तथ्य नसल्याने प्रकरण नस्तीबध्द करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## निमगाव (ता. खेड, जि. पुणे) येथील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(४०) ७०४४४ (२५-०८-२०२३). श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निमगाव (ता.खेड,जि.पुणे) या ग्रामपंचायतीमध्ये श्रीक्षेत्र खंडोबाचे देवस्थान असून या देवस्थानाला पुणे जिल्ह्यासह अन्य जिल्ह्यातील भाविक दर्शनाकरिता येत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर देवस्थान असलेल्या नदीलगत कॉक्रीट संरक्षण भिंत, अण्णा वस्ती येथे रस्ता डांबरीकरण करण्याबाबत गावातील स्थानिकांनी प्रशासनाकडे निवेदनाद्वारे वारंवार मागणी करूनही अद्यापर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुसार सदर रस्त्याचे तातडीने डांबरीकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०३-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) याबाबत कोणतीही मागणी जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झालेली नाही. मात्र सदरच्या रस्त्याची व काँक्रीट संरक्षक भिंत बांधण्याच्या जागेची पाहणी केली असून सदर रस्ता एकूण १ कि.मी. असून रस्त्याच्या डांबरीकरण करण्याकरिता रु.४५.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच संरक्षण भिंत ५० मीटर लांब असून त्यासाठी रु.२०.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सदर कामांच्या मंजुरीसाठी प्रस्ताव जिल्हा परिषदेमार्फत जिल्हा नियोजन समितीकडे सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्हयात जलजीवन मिशन योजने अंतर्गत पाणीपुरवठा योजनांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(४१) ७०४४७ (२५-०८-२०२३). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हासह बिलोली-देगलूर तालुक्यात कंत्राटदाराकडून जलजीवन मिशन योजने अंतर्गत पाणीपुरवठा योजनांची कामे कंत्राटदारांकडून निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत नागरिकांनी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील योजने अंतर्गत नियमानुसार पाईपलाईन टाकताना ३ फुट खोल खोदणे आवश्यक असताना सबंधित कंत्राटदाराकडून केवळ एक-दीड फुट खोदकाम करुन पाईपलाईन टाकत असल्याचे तसेच काही ठिकाणी नविन विहिर बांधण्याचे प्रयोजन असतानाही विहीर बांधण्यात आली नसल्याचे व अनेक ठिकाणी कामे अपूर्ण स्थितीत असल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तक्रार करुनही चौकशी करण्यात आली नसल्याची तक्रार मा.पालकमंत्री यांच्याकडे केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी मा.पालकमंत्री यांनी चौकशी समितीची नियुक्ती करुन चौकशी करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२८-०२-२०२४) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) अंशतःखरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीदरम्यान नागरीकांच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तोंडी तक्रार दिली होती. त्याअनुषंगाने मा. पालकमंत्री महोदयांनी सदर बैठकीत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करुन जल जीवन मिशनची कामे गुणवत्तापुर्वक करुन घेण्याच्या तोंडी सूचना दिल्या आहेत.

तथापि, जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत योजनेमध्ये सर्व ठिकाणी तीन फुट वा त्यापेक्षा जास्त खोदकाम करून पाईपलाईन टाकण्यात येत आहेत. ज्या अंदाजपत्रकात नवीन विहीर बांधण्याचे प्रयोजन करण्यात आले आहे, त्या ठिकाणी नवीन विहीर बांधण्यात येत आहे. सदर योजने अंतर्गत कामाची गुणवत्ता राखण्यासाठी उपविभागाचे शाखा अभियंता/ उप अभियंता, वॅप्कॉस चे शाखा अभियंता यांचेमार्फत कामाच्या प्रत्येक स्थळी पाहणी करून योग्य ते तांत्रिक मार्गदर्शन करण्यात येत आहे. सदर कामाचे टाटा कन्सलटन्सी सर्विसेसमार्फत थर्ड पार्टी इन्सपेक्शन करून कामाची गुणवत्ता राखण्यासाठी योजनेसाठी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या चाचण्या घेण्यात येत आहेत. जसे की Trial Bore Report, Mix Design, Cubu Test Report, Water Test Report, Hydraulic Test Report इत्यादी. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील जल जीवन मिशन अंतर्गतची कामे गुणवत्तापूर्वक होत आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सेलू (जि. परभणी) तालुक्यात एमआयडीसी प्रकल्प उभारणेबाबत

**(४२) ७०६७२ (३१-०८-२०२३). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू (जि.परभणी) तालुक्यात एमआयडीसी व केंद्र शासनाच्या पीएम मित्र योजनेअंतर्गत टेक्सटाईल पार्क सुरु करण्याचे शासनाचे नियोजन असून यामुळे तालुक्यातील नागरीकांना रोजगार उपलब्ध होणार असल्याने रवळगाव, पिंप्रोळा हदगाव (पावडे) या तीन शिवारातील जमिनी एमआयडीसी प्रकल्पात समाविष्ठ करण्याचे नियोजन शासनाकडून केले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेलू-सातोना या रस्त्यांवरील जमिनीचे वाढलेले भाव व जिरायती आणि कोरडवाहु जमिनीच्या दराबाबत शेतक-यांमध्ये संभ्रम असल्याने सेलु तालुक्यातील हादगाव (पावडे), पिंप्रोळा, रवळगाव शिवार येथील सुमारे २४५.८१ हेक्टर जमिनीचे अद्याप भूसंपादन होऊ शकलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मा. उद्योग मंत्री यांनी स्थानिक लोकप्रितीनिधी व जिल्ह्यातील शासनाचे अधिकारी यांच्या बैठक घेऊन एमआयडीसी भूसंपादनाचा प्रश्न मार्गी लावण्याचे आदेश शासनाच्या संबंधित अधिका-यांना दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त आदेशाच्या अनुषंगाने सेलू येथे एमआयडीसी व टेक्स्टाईल पार्क उभारणी बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०९-११-२०२३) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

सेलू औद्योगिक क्षेत्रात टेक्सटाईल पार्क विकसित करण्यासाठी मौजे-रवळगाव,पिंपरुळा व हदगाव,जि.परभणी येथे २४५.८१ हेक्टर आर खाजगी क्षेत्रास महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम,१९६१ अन्वये प्रकरण ६ च्या तरतुदी लागू करण्याची अधिसूचना दि.०२ डिसेंबर,२०१६ रोजीच्या शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, परभणी यांना दिनांक ०३.०१.२०१७ रोजीच्या शासन पत्रान्वये भूसंपादानाची कार्यवाही करण्यास कळविण्यात आले आहे.

सदर भूसंपादन प्रकरणी महामंडळाने रु.२५.७६ लक्ष प्रती हेक्टरी इतक्या दराने भूसंपादन करणेबाबत प्रस्तावित केले होते. तथापि, तेथील शेतकऱ्यांनी संपदित होणाऱ्या जमीनीस प्रती हेक्टरी रु.३५.०० लक्ष व त्यापेक्षा अधिक दर देणेची मागणी केल्याने सदर भूसंपादन उद्योगांच्या मागणीनुसार Pass through पध्दतीने करणेबाबत महामंडळाच्या स्तरावर निर्णय घेण्यात आलेला आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

सेलू औद्योगिक क्षेत्राच्या भूसंपादनाबाबत दि.०३.११.२०२२ रोजी शासन स्तरावर आयोजित बैठकीत दराबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी मऔवि महामंडळाच्या स्तरावर एकत्रित बैठक आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

त्यानुसार दि.०७.०२.२०२३ रोजी सहमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन), मऔवि महामंडळ यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी, परभणी , उप मुख्य कार्यकारी अधिकारी (३) व प्रादेशिक अधिकारी, मऔवि महामंडळ यांची बैठक झाली. सदर बैठकीत शेतकऱ्यांच्या मागणीनुसार द्यावयाचा दर व विकास कामावरील खर्च लक्षात घेता, भुखंड वाटपाचा दर प्रती चौ.मि.रु.२०००/- पेक्षा जास्त येतो व या दराने भूखंड घेण्यास उद्योजक तयार आहेत का याबाबत उद्योजकांसोबत चर्चा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी,सेलू यांचे अध्यक्षतेखाली दि.१०.०२.२०२३ रोजी स्थानिक उद्योजकांसोबत दराबाबत चर्चा करण्यात आली असता, जास्तीत जास्त रु.८००/- प्र.चौ.मी. दराने सदर भुखंड खरेदी करण्याची तयारी उद्योजकांनी दर्शविली आहे. तथापि, शेतकऱ्यांनी भूसंपादनापोटी केलेली मोबदल्याची मागणी व संभाव्य विकास खर्च यानुसार औद्योगिक क्षेत्राची व्यवहार्यता तपासून पुढील कार्यवाही मऔवि महामंडळामार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा क्रीडा संकूल व अनेक तालुका क्रीडा संकुले योजनांची अपुर्ण असलेली कामे पूर्ण करुन प्रलंबित निधीची अंमलबजावणी तातडीने होणेबाबत

**(४३) ७०७९३ (२५-०८-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००९ साली मंजूर झालेल्या जिल्हा व तालुका संकुलाना शासनाने वाढीव निधीची तरतुद केली आहे. मात्र अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने तरतुद केलेल्या निधीची अंमलबजावणी अद्यापही झालेली नसल्याने रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा क्रीडा संकूल व अनेक तालुका क्रीडा संकुले अपूर्ण अवस्थेत असून, सद्या या क्रीडा संकुलांची दयनीय अवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, शासनाच्या क्रीडा खात्यांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांकरीता सन २०१४ च्या डीएसआर प्रमाणे अनुदान वितरीत केले जाते, परंतु हे अनुदान अत्यल्प सन २०१४ चा डीएसआर सन २०२३ च्या एसएसआर मधील निर्माण होणाऱ्या तफावतीमुळे या योजनांचे प्रकल्प पुर्णत्वास जाणेसाठी अनेक अडचणी निर्माण होतात, हे ही खरे आहे काय.
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त जिल्हा क्रीडा संकुल व तालुका संकुले या योजनांची प्रलंबित कामे पूर्ण करुन प्रलंबित निधीची अंमलबजावणी तातडीने होणेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय बनसोडे (२९-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.
शा.नि. दि.२३.०३.२०२२ अन्वये संकुलाच्या अनुदान मर्यादेत वाढकरण्यात आली असून सदर अनुदान ममर्यादेत मंजूर अंदाजपत्रकानुसार क्रीडा संकुलांना निधी वितरीत करण्यात आलेला आहे.
(२) हे खरे नाही
बांधकामे पूर्ण/अपूर्ण असलेल्या क्रीडा संकुलांना सुधारित अनुदान मर्यादेत मंजूर अंदाजपत्रकानुसार निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. जिल्हा क्रीडा संकुल, रत्नागिरी करीता रु.२७५६.३० लक्ष रक्कमेच्या अंदाजपत्रकास मान्यता देऊन रु.११४५.00 लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) जिल्हा नियोजन विकास समिती (DPDC) मार्फत व्यायामशाळा विकास अनुदान योजनेच्या अनुज्ञेय अनुदान मर्यादमध्ये वाढ करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच क्रीडा धोरणांतर्गत क्रीडा संकुलांची अनुदान मर्यादा सुधारित करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही..
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### आंतरराष्ट्रीय,राष्ट्रीय खेळाडू व निवृत्त खेळाडू यांच्या मानधनात वाढ करणेबाबत

**(४४) ७०९०७ (२५-०८-२०२३). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आंतरराष्ट्रीय खेळाडू व निवृत्त खेळाडूना शासनाच्या क्रीडा विभागामार्फत अत्यंत अल्प मानधन दिले जात असल्याचे दिनांक ०१ मार्च, २०२३ रोजी व त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त खेळाडूंना व निवृत्त खेळाडूंना देण्यात येणाऱ्या मानधनांमध्ये वाढ करणेबाबत शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्ती प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने आंतरराष्ट्रीय खेळाडू व निवृत्त खेळाडू यांच्या मानधनात वाढ करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (३१-१०-२०२३) :**(१) व (२) व (३) नाही
मानधन रकमेत वाढ करण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई मधील घरगुती सेवा पुरविणारी अर्बन कंपनीने कर्मचाऱ्यांना अचानक सूचना न देता सेवेतून कमी केल्याबाबत

**(४५) ७१०३३ (२५-०८-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई मधील घरगुती सेवा पुरविणारी अर्बन कंपनीने ५०० कर्मचाऱ्यांना सूचना न देता अचानक सेवेतून कमी केल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एखाद्या कामगाराचा प्रतिसाद दर किंवा त्यांनी ऑफर केलेले बुकींग स्वीकारण्याचा दर ८० टक्यांपेक्षा कमी झाला तर कर्मचाऱ्यांचा आयडी ब्लॉक केला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सदर कंपनीतील कंपनीतील कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२१-११-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) मे. अर्बन कंपनी ही गुडगाव, हरियाणा येथून संपुर्ण देशात ई कॉमर्स माध्यमातून, घरगुती सेवा पुरविणारा प्लॅटफार्म आहे. तेथे कोणीही कामगार किंवा कर्मचारी नसून, सेवा प्रदाते म्हणजे भागीदार आहेत. अर्बन कंपनीच्या सेवा प्रदाते ( भागीदार) यांनी दि.२७.०६.२०२३ रोजी कामगार आयुक्त कार्यालयास निवेदन दिले होते. त्याअनुषंगाने उभयपक्षांची बैठक दि.१८.०७.२०२३ रोजी कामगार आयुक्त कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये व्यवस्थापन व सेवाप्रदाते यांच्यामध्ये मालक / कामगार हे नाते प्रस्थापित होत नसल्याचे आढळून आले. एखाद्या सेवा प्रदात्याला ऑनलाईन ॲपद्वारे वाटप केलेल्या ग्राहक सेवा विनंत्यांपैकी ७० टक्के विनंत्या स्वीकारणे अनिवार्य आहे. मात्र सेवा प्रदाते (भागीदार) त्यांच्या खराब सेवा गुणवत्तेमुळे आणि मोठया संख्येने ग्राहकांच्या विनंत्या वारंवार रद्द करित असल्यास, त्यांना त्यांच्या कृतीबाबत माहिती देण्यात येते, त्यांना सुधारण्यासाठी पुरेशी संधी देऊन तसेच, प्रत्येकास किमान २-३ सत्रात प्रशिक्षण देऊनही त्यांच्या वर्तनात कोणताही बदल न झाल्यास, स्वाक्षरी केलेल्या अटींचे व कराराचे उल्लंघन झाले असे गृहित धरुन सेवा प्रदाते (भागीदार) यांना ऑनलाईन ॲपवरील यादीतून कमी करुन त्यांचे आय.डी. सदर कंपनीमार्फत ब्लॉक करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर विमानतळाच्या हवाई धावपट्टीसाठी भूसंपादन प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

**(४६) ७१०६६ (३१-०८-२०२३). श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर विमानतळावरील हवाई धावपट्टीच्या विस्तारीकरणासाठी आवश्यक असलेल्या भूसंपादनाची कार्यवाही बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विमानतळावरील हवाई धावपट्टी व हवाई वाहतुकीसाठी आवश्यक बाबी प्रलंबित असल्याने विमानतळ अनेक वर्षांपासून बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी आवश्यक असलेल्या भूसंपादनाची धारिका शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर विमानतळ सुरु करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी रिलायन्स एअरपोर्ट अथोरिटी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, लातूर व संबंधित अधिकाऱ्यांची वेळोवेळी आढावा बैठक घेऊन पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, लातूर विमानतळाची प्रलंबित कामे पूर्ण करून विमानतळ विनाविलंब सुरु करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२०-११-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२),(३),(४) व (५)

सदर औद्योगिक क्षेत्राच्या प्रकरण ६ च्या अधिसूचनेस शुध्दीपत्रक दिनांक ३१.८.२०२३ रोजी प्रसिध्द केले आहे. त्यानुसार अंतीम क्षेत्र ४८.८० हे.आर आहे.

संमती दिलेल्या ३८.९२ हे.आर क्षेत्राचा ताबा मऔवि महामंडळास प्राप्त झाला आहे.

उर्वरीत ९.८८ हे.आर क्षेत्रास मऔवि अधिनियमाच्या कलम ३३(३) नुसार सक्तीचे भूसंपादन करण्यास दिनांक १ सप्टेंबर

२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.सदर क्षेत्र संपादन करण्यास नुकसान भरपाई उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही म.औ.वि. महामंडळाच्या स्तरावर सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहाड,कल्याण (प.) येथील एम.आय.डी.सी.चा विस्तार करणेबाबत

**(४७) ७११६२ (२९-०८-२०२३). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहाड, कल्याण (प.) येथील एम.आय.डी.सी.मध्ये भूखंड उपलब्ध नसल्याने नवीन व तरुण उद्योजकांना नवीन उद्योग व्यवसाय उभारण्यात मोठया प्रमाणात अडथळा निर्माण होत असल्याची बाब दिनांक ०१ जून,२०२३ रोजी व त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवीन उद्योग व्यवसाय सुरु करण्यास चालना मिळत नसल्याने तेथे बेरोजगारीचे प्रमाण देखील दिवसेंदिवस वाढत आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहाड, कल्याण (प.) येथील एम.आय.डी.सी.चा विस्तार करणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (१६-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत शहाड, कल्याण (प.) येथे कोणतेही औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात आलेले नाही. तसेच शहाड येथे औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नरखेड (जि. नागपूर) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळच्या विस्तारीकरणाबाबत

**(४८) ७११९७ (३१-०८-२०२३). श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नरखेड (जि.नागपूर) येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला २०.५९ हेक्टर जागा वितरीत करण्यात आली असून टप्पा दोन मध्ये येथे नव्याने १५४.४४ हेक्टर जमीन खरेदी करण्याचा प्रस्ताव शासनाला सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच या औद्योगिक विकास महामंडळाला रस्ता नसल्याने नविन रस्ता निर्माण करण्यासाठी जमीन अधिग्रहीत करुन नविन रस्ता तयार करण्यासाठी ७० लक्ष रुपये निधी मंजुर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.उदय सामंत (१६-०१-२०२४) :**(१)दि.०९.०२.२०२२ रोजी तत्कालीन मा. राज्यमंत्री (उद्योग) यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीतील निर्देशानुसार नरखेड टप्पा -२ औद्योगिक क्षेत्राकरीता मौजे वडेगांव (उमरी) येथील खाजगी १३४.९९ हे.आर. व सरकारी १९.४५हे.आर.
अशी एकूण १५४.४४ हे.आर.जागेची मऔवि महामंडळाच्या भूनिवड समितीने दि.३१.०५.२०२३ रोजी स्थळपाहणी केलेली असून त्यानुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियमानुसार भुसंपादनाबाबतची पुढील कार्यवाही सुरु आहे.
(२) नरखेड (जि.नागपूर) येथील औद्योगिक क्षेत्राकरीता नविन पोहोच रस्ता निर्माण करण्यासाठी आवश्यक २३४० चौ.मी.खाजगी जमीन अधिग्रहीत करण्यात आली असून, त्याकरीता रुपये ७०.२० लक्ष इतकी रक्कम संबंधित जमीन धारकांना अदा करण्यात आली आहे. सदर नविन रस्त्याचे कामासाठी एकूण रु.३००.७० लक्ष (नि.) रकमेच्या प्रस्तावास

प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली असून, पुढील कार्यवाही मऔवि महामंडळाच्या स्तरावर सुरु आहे.
(३) वरीलप्रमाणे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आर्वी (जि.वर्धा) येथील शहरी व ग्रामिण भागामध्ये असलेल्या अंगणवाडी करिता स्वतंत्र पाणी पुरवठा व विद्युत व्यवस्था करणेबाबत**

**(४९) ७१४४७ (२८-०८-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी (जि.वर्धा) येथिल शहरी व ग्रामिण भागामध्ये असलेल्या अंगणवाडी करिता स्वतंत्र पाणी पुरवठा व विद्युत व्यवस्था नाही, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, येथिल अनेक शहरी व ग्रामिण भागातील अंगणवाडयामध्ये पाणी पुरवठा व विद्युत व्यवस्था नसल्यामुळे लहान बलकांची गैरसेय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामिण व शहरी भागातील अंगणवाडया करिता विद्युत व पाणी पुरवठयाची स्वतंत्र व्यवस्था करण्यासाठी शासन निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (२१-११-२०२३)** (१) आर्वी (जि.वर्धा) येथिल शहरी व ग्रामिण भागामध्ये असलेल्या अंगणवाडी केंद्रांची माहिती खालील प्रमाणे आहे.

| क्षेत्र | मंजूर अंगणवाडी केंद्र | स्व:च्या इमारतीतील अंगणवाडी केंद्र | पिण्याचे पाण्याची सोय असलेले अंगणवाडी केंद्र | विद्युत सुविधा उपलब्ध असलेले अंगणवाडी केंद्र |
|---|---|---|---|---|
| शहरी | २६ | १६ | १० | १० |
| ग्रामीण | १४४ | १४१ | १२२ | १२७ |

(२), (३) व (४) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ३१ जानेवारी, २०२२ अन्वये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत महिला व बाल विकास सशक्तीकरण योजनेसाठी किमान ३ % इतका निधी कायम स्वरुपी उपलब्ध करणेबाबत मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये अंगणवाडी केंद्रांना पाणीपुरवठा करणे व वीज पुरवठा करणे याबाबतचे प्रावधान करण्यात आले आहे.

---

**आर्वी, आष्टी व कारंजा (जि. वर्धा) येथील सर्व ग्राम पंचायत मधील सार्वजनिक शौचालयांच्या बांधकामात झालेला अपहारा**

**(५०) ७१४५१ (२८-०८-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी, आष्टी व कारंजा (जि. वर्धा) येथील सर्व ग्राम पंचायत मधील सार्वजनिक शौचालयांचे बांधकाम करण्यात आले असून ते अंदाज पत्रकानुसार झाले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शौचालयाच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकात कोठेही सेप्टी टँकचे बांधकाम न घेता अंदाज पत्रकास मंजुरी देण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शौचालय बांधकामाचा असलेला हेतु सेप्टी टँक नसल्यामुळे उघडयावर घाण सोडण्यात येत असून त्यामुळे रोग राई वाढणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर पंचायत समिती अंतर्गत बिना सेप्टी टँक शौचालय बांधकाम करणाऱ्या संबंधित अभियंता व कंत्राटदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०५-०२-२०२४) :**(१) हे खरे नाही.
आर्वी, आष्टी व कारंजा (जि. वर्धा) येथील सर्व ग्रामपंचायती मधील मंजूर सार्वजनिक शौचालयांचे बांधकाम अंदाजपत्रकानुसार करण्यात आले आहे.
(२) शासन निर्णय दिनांक १२/०४/२०२२ नुसार सार्वजनिक शौचालय बांधकामासाठी दोन शोषखड्ड्यांचे शौचालय हा तांत्रिक पर्याय उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्यामुळे दोन शोषखड्डे शौचालय हा तांत्रिक पर्याय विचारात घेवून, सदर शौचालयांच्या बांधकामांचे अंदाजपत्रक तयार करण्यात येवून त्यास जिल्हा स्तरावरून मंजूरी देण्यात आली आहे.
(३) व (४)
स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II अंतर्गत, सार्वजनिक शौचालय दोन शोषखड्ड्यांचे बांधण्याचे शासनाचे निर्देश आहेत. सार्वजनिक शौचालयांच्या शोषखड्ड्यावर वरून झाकण असल्याने व शोषखड्डे बंदिस्त असल्याने, कुठल्याही प्रकारची उघड्यावर घाण होत नाही, त्यामुळे रोगराई वाढणार नाही.
शासन निर्देशानुसार, दोन शोषखड्ड्यांच्या सार्वजनिक शौचालयांचे बांधकाम करण्यात आले असल्याने, संबधित अभियंता व कंत्राटदार यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्धभवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.